# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.

☏ : २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web : ropune.org.in

जा.क्र : तंशिविकापु/विवि/प्रवेश २०१४-१५/२०१९/ 2313 दिनांक : 10 JUN 2019

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त
सर्व शासकीय, शासकीय अनुदानित व विना अनुदानित
अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्था,

विषय : शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये **मुस्लिम आरक्षणांतर्गत (विशेष मागास प्रवर्ग-अ)** थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांचे जात पडताळणीबाबत.

संदर्भ : अल्पसंख्यांक विकास विभाग, यांचा शासन निर्णय क्रमांक अविवि २०१४/प्र.क्र.८१/का.७ दिनांक १९/०७/२०१४. **(सन २०१४ महाराष्ट्र आध्यादेश क्रमांक १४ दिनांक ०९/०७/२०१४)**

उपरोक्त विषयास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये शासनाचे संदर्भिय महाराष्ट्र आध्यादेश क्रमांक १४ नुसार थेट व्दितीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमात मुस्लिम आरक्षणांतर्गत (विशेष मागास प्रवर्ग-अ) विद्यार्थ्यांचे प्रवेश झालेले होते. सदर शैक्षणिक वर्षात प्रवेशित विद्यार्थी आता अभ्यासक्रम पुर्ण करुन उत्तिर्ण झालेले आहेत. परंतु मुस्लिम आरक्षणाला (विशेष मागास प्रवर्ग-अ) मा. उच्च न्यायालयाने दिनांक १४/११/२०१४ च्या आदेशान्वये स्थगिती दिलेली असल्याने सदर विद्यार्थ्यांना आता जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त होत नाहीत. सदर विद्यार्थ्यांनी त्यांचा पदवी अभ्यासक्रम पुर्ण केलेला असेलही, परंतु जात पडताळणी प्रमाणपत्राअभावी विद्यापीठाने त्यांचे परीक्षांचे निकाल प्रलंबीत ठेवलेले आहेत.

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये मुस्लिम आरक्षणांतर्गत (विशेष मागास प्रवर्ग-अ) थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमात प्रवेशित व अभ्यासक्रम यशस्वीरित्या पुर्ण केलेल्या परंतू जात पडताळणी प्रमाणपत्रअभावी विद्यापीठ परीक्षांचे निकाल प्रलंबीत ठेवलेल्या विद्यार्थ्यांची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रात भरुन **दिनांक १४/०६/२०१९** पर्यंत या कार्यालयाच्या **info.ropune@gmail.com** या ई-मेलवर सॉफ्ट कॉपीसह पाठवावी.

प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.

# प्रपत्र

| अ.क्र. | संस्थेचा कोड | संस्थेचे नाव | अभ्यासक्रमाचे नाव | शै. वर्ष २०१४-१५ तील थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांत **मुस्लिम आरक्षण (विशेष मागास प्रवर्ग-अ) अंतर्गत** प्रवेशित गुणवत्ता यादीतील जात पडताळणी प्रमाणपत्राअभावी त्रुटी पुर्तता न झालेले विद्यापीठ परीक्षांचे निकाल प्रलंबीत ठेवलेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

प्राचार्य,
संस्थेचे नांव